## अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज आश्रम व्दारा संचालीत

श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय,गुरुकुंज आश्रम जि. अमरावती ४४४९०२

फोन नं. ०७२२५-२२४२२९

### जाहिरात

श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय, गुरुकुंज आश्रम जि. अमरावती येथील वर्ग-३ व व वर्ग-४ ची खालील दर्शविलेली रिक्त पदे भरण्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | संवर्ग | वेतन श्रेणी | पदसंख्या | सवंर्ग आरक्षण | खुला प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ग - ०३ | | | | |
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | वर्ग - ३ | ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन - ४२०० | ०१ | | खुला - १ | महिला |
| २ | भांडारपाल | वर्ग - ३ | ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन - १९०० | ०१ | | खुला - १ | |
| ३ | कनिष्ठ लिपीक | वर्ग - ३ | ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन - १९०० | ०२ | | खुला - २ | महिला - १ |
| ४ | संग्रहपाल | वर्ग - ३ | ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन - १९०० | ०१ | एस.टी. - १ | | |
| ५ | प्रसाविका | वर्ग - ३ | ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन - १९०० | ०२ | व्हीजे/एनटी - १ | खुला - १ | |
| ६ | रुग्णवाहीका चालक | वर्ग - ३ | ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन - १९०० | ०१ | | खुला - १ | |
| | | | **एकुण** | **०८** | **०२** | **०६** | |
| | | | वर्ग - ०४ | | | | |
| ७ | दायी | वर्ग - ४ | ४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन - १६०० | ०२ | एस.सी. - १ | खुला - १ | |
| ८ | शिपाई | वर्ग - ४ | ४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन - १३०० | ०१ | | खुला - १ | महिला |
| ९ | माळी | वर्ग - ४ | ४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन - १३०० | ०१ | | खुला - १ | माजी सैनिक |
| १० | सफाईगार | वर्ग - ४ | ४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन - १३०० | ०२ | | ०२ | |
| | | | **एकुण** | **०६** | **०१** | **०५** | |
| | **वर्ग ०३ व वर्ग ०४ एकुण** | | | **१४** | **०३** | **११** | |

समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविण्यात आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील एकुण पदापैकी आहे. समांतर आरक्षणापैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील पात्र उमेदवार भरले जाईल.

## आवश्यक किमान शैक्षणिक अहर्ता:-

| अ.क्र. | पदनाम | संवर्ग | आवश्यक शैक्षणिक अहर्ता | इतर |
|---|---|---|---|---|
| १ | भांडारपाल | वर्ग - ३ | १) उमेदवार माध्यमिक शालांत परिक्षा /उच्च माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा. | उमेदवार मराठी व हिंदी विषयासह परिक्षा उत्तीर्ण असावा. तसेच मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रतिमीनिट असावा. |
| २ | कनिष्ठ लिपीक | वर्ग - ३ | १) उमेदवार माध्यमिक शालांत परिक्षा /उच्च माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा. | उमेदवार मराठी व हिंदी विषयासह परिक्षा उत्तीर्ण असावा. तसेच मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रतिमीनिट असावा. |
| ३ | संग्रहपाल | वर्ग - ३ | १) उमेदवाराने माध्यमिक शालांत परिक्षा विज्ञान विषयासह उत्तीर्ण केलेली असावी. | |
| ४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | वर्ग - ३ | १) उमेदवार भौतिक, रसायन जीवशास्त्र विषय घेवुन बी.एस.सी. उत्तीर्ण असावा.<br>२) मान्यता प्राप्त संस्थेचा डिप्लोमा इन मेडीकल लेबॉलेटरी टेक्नॉलॉजी (DMLT) अहर्ता धारक उमेदवारास प्राधान्य.<br>३) उमेदवार मराठी व हिंदी विषयासह परिक्षा उत्तीर्ण असावा. | |
| ५ | प्रसाविका | वर्ग - ३ | १) उमेदवाराने (महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त संस्थेतील) महाराष्ट्र शासन मान्यता ANM अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला असावा.<br>२)उमेदवाराची महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सील मुंबई येथे नोंदणी झालेली असावी.<br>३) उमेदवारांनी ज्या संस्थेतुन ANM प्रशिक्षण पुर्ण केलेले असेल त्या संस्थेचा अभ्यासक्रम हा भारतीय परिचर्या परिषदेचा असावा. व उमेदवार महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सीलची परिक्षा उत्तीर्ण असावा. तसेच त्या संस्थेस महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सीलची मान्यता असावी. | नियुक्तीनंतर एक वर्ष परिविक्षाधीन कालावधी राहील. |
| ६ | रुग्णवाहीका चालक | वर्ग - ३ | १) उमेदवार वर्ग – ४ उत्तीर्ण असावा तसेच मराठी लिहिता वाचता आले पाहिजे. | जड वाहन चालविण्याबाबतचे मोटर ड्रायव्हींग लायसंस तसेच ५ वर्षाचा मोटार गाडी चालविण्याचा अनुभव. बॉम्बे मोटर व्हेहीकल ॲक्ट ॲण्ड रुल्स प्रमाणे निर्दोष दृष्टी असणे आवश्यक. |
| ७ | दायी | वर्ग - ४ | १) उमेदवार वर्ग ४ थी उत्तीर्ण असावा.<br>२) मान्यता प्राप्त संस्थेकडुन व रुग्णालयाकडुन मिळालेले दाईच्या प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र. | |
| ८ | शिपाई | वर्ग - ४ | उमेदवार वर्ग -४ उत्तीर्ण असावा. | |
| ९ | माळी | वर्ग - ४ | उमेदवार वर्ग -४ उत्तीर्ण असावा. | |
| १० | सफाईगार | वर्ग - ४ | उमेदवार वर्ग -४ उत्तीर्ण असावा. | |

## विशेष सुचना:-

### १) वयोमर्यादा:-

अ) जाहीरातीत नमुद केलेल्या वर्ग-३ व वर्ग -४ च्या पदांकरीता वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकास किमान १८ वर्ष पुर्ण तसेच कमाल वय ३३ वर्ष असणे आवश्यक.

ब) मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथील करुन कमाल वर्ष ३८ वर्ष राहील. माजी सैनिक/अपंग/खेळाडु उमेदवारांसाठी नियमानुसार विहित केलेली ४५ वर्ष कमाल वयोमर्यादा राहील.उमेदवाराच्या वयाची अट ही वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकास पुर्ण होणे आवश्यक आहे.

क) १९९१ जनगणना कर्मचारी/स्वतंत्र सैनिक पाल्य/१९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी उमेदवारां करिता शासन निर्णय दिनांक ०६/१०/२०१० मधील तरतुदीनुसार ४५ वर्ष अट राहील.प्रकल्पग्रस्त /भुकंपग्रस्त उमेदवारांकरिता ४५ वर्ष आणि अंशकालीन उमेदवारांकरिता ४६ वर्ष शासन निर्णयातील तरतुदीनुसार वयाची सुट राहील.

**२) इतर अहर्ता:-** सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय दि. १९/०३/२००३ नुसार अनु. क्र. १ व ५ पदाकरीता D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा "O" स्तर किंवा "A" स्तर किंवा "B" स्तर किंवा "C" स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुबंई यांच्याकडील MS-CIT परिक्षा उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नसल्यास किंवा नियुक्तीनंतर २ वर्षात सदर अहर्ता प्राप्त न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

## सर्वसाधारण अटी, शर्ती व आवश्यक सुचना:-

१) अर्जदार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. (अधिवास प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक).

२) इच्छुक उमेदवाराने विहित नमुन्यातील आपले परिपुर्ण अर्ज स्व हस्ताक्षरात भरुन पाकिटावर ठळक अक्षरात "-----------------" या पदासाठी अर्ज (रिकाम्या जागी पदाचे नाव लिहावे.) असे नमुद करावे. व हे अर्ज प्राचार्य श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय, गुरुकुंज आश्रम जि. अमरावती. या पत्यावर **दिनांक ०६/०८/२०१४** रोजी संध्या. ५.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत. त्यानंतर पोष्टाने किंवा अन्य प्रकारे आलेले कोणतेही अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच एका पदासाठी केवळ एकच अर्ज करावा. एकापेक्षा जास्त पदाकरिता एकच अर्ज केल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.

३) अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक अहर्ता, जन्म तारीख, सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि उपलब्ध असल्यास जात पडताळणी समितीचे जात वैधता प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्यात वास्तव्य असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र, अनुभव इत्यादीच्या सक्षम प्राधिकाऱ्याने /स्वसाक्षांकित केलेल्या छाया प्रती जोडाव्यात. प्रमाणपत्राच्या मुळ प्रती अर्जासोबत जोडु नयेत.

४) अर्जदारास मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५) उमेदवाराने अलीकडील पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र अर्जावर तसेच प्रवेशपत्रावर चिकटावे. व त्यावर उमेदवाराने स्वतःची स्वाक्षरी करावी.

६) परिक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी उमेदवारांनी आपले प्रवेशपत्र बरोबर आणले पाहिजे. प्रवेशपत्र नसल्यास उमेदवारास परिक्षेस बसु दिले जाणार नाही.

७) उमेदवारास परिक्षेसाठी/मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल. त्यासाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही.

८) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज, विहित नमुन्यात नसलेले अर्ज, मजकुर अपुर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, स्वाक्षरी नसलेले अर्ज, विहित प्रमाणपत्रे साक्षांकित करुन न जोडलेले अर्ज, विहित शुल्क न भरलेले अर्ज, फोटो नसलेले अर्ज व विहित कालावधीत प्राप्त न झालेले अर्ज, इ. प्रमाणे इतर उणीवा असलेले अर्ज फेटाळण्यात येतील. फेटाळलेल्या अर्जासोबत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

९) वर्ग -३ च्या अनु. क्र. १ ते ६ (एक ते सहा) पदाकरिता परिक्षा शुल्क खुला वर्ग रु. ३००/- व राखीव प्रवर्ग रु. १५०/- तसेच वर्ग -४ च्या अनु. क्र. ७ ते १० (सात ते दहा) पदाकरिता परिक्षा शुल्क खुला वर्ग रु. २००/- व राखीव प्रवर्ग रु. १००/- चा धनाकर्ष राष्ट्रीय कृत बँकेचा प्राचार्य, श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय, गुरुकुंज आश्रम या नावाने काढण्यात यावा. माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु नाही.

१०) उमेदवाराने अर्जासोबत स्वतःचा पत्ता असलेले रु. २५/- चे पोस्टाचे तिकीट लावलेले 28x12 से.मी. आकारचे २ लिफाफे जोडणे आवश्यक आहे. (स्वतःचा पत्ता असलेला व २५/- चा पोस्टाचे तिकीट लावलेल्या आकाराचे लिफाफे जोडले नसल्यास उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.)

११) सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/१७/२०००/१२ दिनांक ०१/०७/२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहीत उमेदवारांनी सुध्दा लागु नाही असे नमुद करुन सदर प्रतिज्ञापत्र स्वाक्षरी करुन सादर करणे आवश्यक आहे.) शासन निर्णय वित्त विभाग, संकीर्ण – १०००/प्र.क्र.७०/सेवा-५ दिनांक ११/०८/२००० नुसार विहित अटी लागु राहतील.

१२) प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार परिक्षेचे ठिकाण, दिनांक व वेळ प्रवेशपत्रावर कळविण्यात येईल.

१३) वर्ग-३ चे (रुग्णवाहीका चालक पद वगळुन इतर सर्व) पदासाठी २०० गुणाची लेखी परिक्षा घेवुन गुणवत्तेनुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल. रुग्णवाहीका चालक या पदाकरिता १०० गुणाची व्यावसायीक चाचणी घेण्यात येईल. सदर व्यावसायीक चाचणी परिक्षा पदाच्या सबंधीत कामावर आधारित राहील. वर्ग-४ चे माळी, शिपाई दाई व सफाईगार या पदासाठी ७५ गुणाची लेखी परिक्षा व २५ गुणाची तोंडी परिक्षा घेवुन गुणवत्तेनुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल.

१४) वर्ग-३ चे (रुग्णवाहीका चालक पद वगळुन इतर सर्व) पदाकरिता लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक २ गुण ठेवण्यात येतील. प्रश्न मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी इत्यादी विषयावर आधारीत राहतील. वर्ग-४ चे माळी, शिपाई दाई आणि सफाईगार या पदासाठी लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्न चौथी वर्गाच्या स्तरावरील मराठी, गणित, इतिहास –नागरिकशास्त्र , भुगोल व सामान्य ज्ञान क्रमिक अभ्यासक्रमावर आधारित राहील.

१५) गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने लेखी परिक्षेत एकुण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

१६) लेखी परिक्षेत समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई शासन निर्णय क्रमांक प्रानिम-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ दि. २७/०६/२००८ ला अधिन राहुन गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

१७) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती /अगर कागदपत्रे खोटी असल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

१८) शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखामार्फत सादर करावे किंवा "ना हरकत प्रमाणपत्र" अर्जासोबत जोडावे. परवानगीशिवाय सादर केलेल्या अर्जाच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार नाही.

१९) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती,भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ ( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि. जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागु आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगट गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र दिनांक ३१ मार्च २०१५ पर्यंत वैध असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केल्या जाणार नाही. व अश्या उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.

२०) अंशकालीन कर्मचाऱ्यांना त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक आहे. तसे केल्याचे पुरावे अर्जासाबत जोडावे. तसेच उमेदवार माजी सैनिकाचे वारस असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी असल्यास प्रमाणपत्राची छायांकीत प्रत करुन अर्जासोबत जोडावी. अपंग/भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२१) एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रकियेतुन बाद करण्यात येईल.

२२) वर्ग-४ च्या पदाची उपलब्ध संख्या व आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ताधारक उमेदवारांना १:६ या प्रमाणात ( १ पदासाठी ६ उमेदवार) मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल.

२३) कोणत्याही कारणास्तव रिक्त पदाच्या संख्येत बदल करणे, समांतर आरक्षणाबाबत बदल करणे, परिक्षेचा प्रकार यात बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार महाविद्यालय स्वतःकडे राखुन ठेवीत आहे. याबाबतीत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सागंता येणार नाही.

२४) मागासवर्गीय उमेदवाराने जाती वैधता प्रमाणपत्र नियुक्तीपुर्वी अथवा नियुक्तीनंतर ६ (सहा) महिन्याचे आत सादर करणे आवश्यक राहील.

२५) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/ कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल. या जाहिरातीत नमुद केलेल्या पदावर उमेदवाराची निवड, न्यायालयीन निर्णय शांसनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल. उमेदवारास परिक्षेस दिला जाणारा प्रवेश हा उमेदवाराने अर्जात नमुद केलेल्या माहितीच्या आधारे देण्यात येत आहे. मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी अर्जातील माहिती व मुळ कागदपत्रे यात तफावत आढळुन आल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

२६) उमेदवार माजी सैनिकाचे वारस असल्यास, त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डाचे नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकीत प्रत अर्जासोबत जोडावी.

२७) परिक्षा/मुलाखत स्थगित करणे, रद्द करणे अंश्तः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्राचार्य श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय, गुरुकुंज आश्रम जि. अमरावती स्वतः कडे राखुन ठेवीत आहे. याबाबतीत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२८) अपंग उमेदवाराचे अपंगत्व किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे. व त्यासबंधीचे सक्षम वैद्यकिय त्रिसदस्यीय समिती /वैद्यकीय मंडळाचे प्रमाणित केलेल्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२९) अंध उमेदवारांना लेखी परिक्षेच्या वेळी लेखनिकाची आवश्यकता असेल तर त्यांनी अर्जा सोबत तसा वेगळा अर्ज करणे आवश्यक आहे. ऐनवेळी लेखनिकाची मागणी केल्यास विचार केला जाणार नाही. वैयक्तीक लेखनिक वापरल्यास परवानगी दिली जाणार नाही.

३०) महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ/प्र.क्र.४१५/का-२ दि. २५ मे २००१ मधील तरतुदीस तथा शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयास अधिन राहुन देण्यात येईल.

३१) खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामध्ये ठेवण्यात आलेल्या ३० टक्के आरक्षणाच्या सवलतीकरिता शासन निर्णय व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१ /मसेआ/प्र.क्र.४१५/का-२/ दि. २५ मे २००१ अतंर्गत तहसिलदार यांच्या स्वाक्षरीचे परिशिष्ट्र ३ मधील नॉन क्रिमेलअर प्रमाणपत्र उमेदवाराजवळ असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.

३२) उमेदवाराने प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेल्या अर्जांच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाही. सर्व प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाच्या आतील आवश्यक राहतील अन्यथा अंतिम निवडीच्या वेळेस अपात्र ठरवण्यात येईल याची नोंद सर्व उमेदवारांनी घ्यावी. छाननी नंतर वरील प्रमाणपत्रा मध्ये त्रुटी आढळल्यास/माहीती खोटी आढळल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल याची सुध्दा सर्व उमेदवारानी नोंद घ्यावी.

३३) गट क संवर्गातील पदा करीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने किमान शैक्षणिक अर्हता (एस.एस.सी.) गुण पत्रिका सादर करणे अनिवार्य आहे.

३४) निवड प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

३५) आवेदन स्विकृत/अस्विकृत करणे, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल, तसेच अंतीम निर्णय इत्यादी बाबतचे संपूर्ण अधिकार महाविद्यालय स्वतःकडे राखून ठेवीत आहे.

३६) निकालाचा दिनांक आणि इतर सुचना महाविद्यालयाच्या संकेत स्थळ www.sgayurvedcollege.com वर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासाठी उमेदवारांनी ही पुर्ण भरती प्रक्रिया संपेपर्यंत वेळोवेळी जाहीर करण्यात येणाऱ्या सुचनाकरिता महाविद्यालयाची वेबसाईट वारंवार पाहावी.

३७) वर्ग-३ च्या उपरोक्त स्पर्धात्मक परिक्षेच्या लेखी परिक्षेतील प्राप्त गुणाच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. अंतिम गुणवत्ता यादी नंतर मुळ प्रमाणपत्र पडताळणीत अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उमेदवार अपात्र ठरल्यास त्याला उमेदवारीसाठी दांवा करता येणार नाही.

सरचिटणीस
अ.भा. श्रीगुरुदेव सेवा मंडळ,
गुरुकुंज आश्रम जि. अमरावती

प्राचार्य
श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय,
गुरुकुंज आश्रम जि. अमरावती

# अर्जाचा नमुना
## श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय,
## गुरुकुंज आश्रम जि. अमरावती - ४४४९०२

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

या कार्यालयातील ———————————— या पदासाठी अर्ज

1) संपूर्ण नांव :–

| | | |
|---|---|---|
| आडनांव | स्वतःचे नांव | वडिलांचे / पतीचे नांव |

2) पत्रव्यवहाराचा पत्ता :– ————————————

————————————

पिनकोड.................... दूरध्वनी क्रं.एस.टी.डी कोडसह....................

ईमेल आयडी ....................

3) जन्म दिनांक :– ————————————

4) वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध झालेल्या दिनांका रोजीचे वय :– ..........वर्ष..........महिने..........दिवस

5) राष्ट्रीयत्व :– ————————————

6) अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे का :– ————————————

7) ज्या प्रवर्गासाठी अर्ज करावयाचा आहे त्या ठिकाणी (✓) अशी खुण करावी. एकापेक्षा जास्त खुणा केल्यास अर्ज बाद समजला जाईल.

| अ.जा (SC) | अ.ज. (ST) | वि.जा. (अ) (VJ-A) | भ.ज.(ब) (NT-B) | भ.ज.(क) (NT-C) | भ.ज.(ड) (NT-D) | वि.मा.प्र. (SBC) | इ.मा.व. (OBC) | खुला (Open) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

8) महिला,माजी सैनिक,स्वातंत्र्य सैनिक,प्रकल्पग्रस्त,धरणग्रस्त,अपंग व खेळाडू असल्यास ( योग्य ठिकाणी ( ✓) अशी खुण करावी.)

| अ.क्र. | महिला | माजी सैनिक वारस / अपत्य | स्वातंत्र्य सैनिक पाल्यं | प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त वारस / अपत्य | अपंग | खेळाडू |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

9) अपंग असल्यास ( योग्य ठिकाणी ( ✓) अशी खुण करावी.)

| अपंगत्वाचा प्रकार | अंशतः अंध / अल्पदृष्टि | मूकबधीर | अस्थिव्यंग |
|---|---|---|---|
| | | | |

10) शैक्षणिक अर्हता :–

| अ.क्र. | बोर्डाचे / विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |

11) अवगत असणा–या भाषा :– ( योग्य ठिकाणी ( ✓) अशी खुण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

12) कामाचा अनुभव (प्रमाणपत्र जोडले असेल तरच ग्राहय धरले जाईल.)

| अ.कं. | कार्यालयाचे नांव | धारण केलेले पद | वेतनश्रेणी व इतर भत्ते | अनुभवाचा कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |

13) धनाकर्ष क्र.................................दिनांक..............................रुपये....................बँकेचे नाव...........................................................

14) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल :–

1. ------------------------------------------------------------
2. ------------------------------------------------------------
3. ------------------------------------------------------------
4. ------------------------------------------------------------
5. ------------------------------------------------------------
6. ------------------------------------------------------------
7. ------------------------------------------------------------
8. ------------------------------------------------------------
9. ------------------------------------------------------------
10. ------------------------------------------------------------

*टिप – अर्जावर फक्त खूण करुन त्यांच्या स्पष्टीकरणासाठी कागदपत्र न जोडल्यास ती अर्हता ग्राहय धरण्यांत येणार नाही.*

(अर्जदाराची स्वाक्षरी)

# प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी ---------------------------------------------

प्रतिज्ञापुर्वक नमुद करतो/करते की, प्राचार्य, श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय, गुरुकुंज आश्रम यांचे कार्यालयाची वर्ग -३ / वर्ग-४ पदभरतीची जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली आणि मला समजली. सदर ---------------------- पदासाठी व -------------- प्रवर्गाच्या जाहीरातीत विहीत केलेली शैक्षणिक अहर्ता मी धारण केली असुन नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीची मी पुर्तता करतो/करते, याची मी खात्री केलेली आहे. या अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला निवड प्रक्रियेत दिलेला प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. परिणामी मिळालेली नौकरी गमाविण्यास मी बांधील राहील व पुढील योग्य त्या कार्यवाहीस पात्र राहील याची मला जाणीव आहे. तसेच मुलाखतीचे वेळी/ सेवेत रुजु होतांना/ आपल्या सुचनेनुसार पडताळणी साठी मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक असल्याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

(अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी)

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 नुसार
अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना

# प्रतिज्ञापन

## नमुना "अ"
(नियम 4 पहा)

मी श्री./श्रीमती/कुमारी ------------------------------------------------

श्री.----------------------------------------------------------------------यांचा/यांची

मुलगा/मुलगी/पत्नी, वय ------- वर्ष राहणार (पत्ता) ----------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

1) मी ---------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला ------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 28 मार्च, 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------------------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च, 2006 व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :–

दिनांक :–

(अर्जदाराची स्वाक्षरी)

श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय,
गुरुकुंज आश्रम जि. अमरावती - ४४४९०२

# प्रवेश पत्र

(हे प्रवेश पत्र उमेदवाराने भरावे व अर्जासोबत पाठवावे.)

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

1. उमेद्वाराचे नांव :– ______________________________
2. संपूर्ण पत्ता :– ______________________________

   ______________________________

   ______________________________
3. अर्ज केलेले पद :– ______________________________
4. परीक्षा क्रमांक :– ______________________________

**(टिप :– उत्तरपत्रिकेत चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळया शाईच्या बॉलपेनचाच वापर करावा.)**

परीक्षेचे ठिकाण :–

परीक्षा दिनांक व वेळ:–

प्राचार्य
श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय,
गुरुकुंज आश्रम जि. अमरावती